सूचना का अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय

१३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
website : sic.maharashtra.gov.in

दुरध्वनी क्र. ०२२-२२०४९९८४ फॅक्स क्र.०२२-२२०४९९३

**क्रमांक : मुमाआ-२०२३/प्र.क्र.४३/०१** **दिनांक : २३ फेब्रुवारी, २०२४**

**प्रति,**
संचालक,
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
मंत्रालय, मुंबई

**विषय :** जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत
सेवानिवृत्त गट-ब (अराजपत्रिक) संवर्गातील अधिकाऱ्याची करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबतची जाहिरात

वरील विषयाबाबत महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय) येथे सेवानिवृत्त गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्याची करार पद्धतीने नियुक्ती करणेबाबतच्या जाहिरातीचा मसुदा सोबत जोडला आहे. कृपया सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

देशमुखशिरा

**(शिल्पा देशमुख)**
**अवर सचिव**

**प्रत : निवडनस्ती.**

Scanned with CamScanner

<u>राज्य माहिती आयोग (मुख्यालय), मुंबई</u>

**( सेवानिवृत्त गट - ब (अराजपत्रित) संवर्गातील अधिका-यांच्या सेवा करार तत्वावर घेण्याबाबत)**

राज्य माहिती आयोग (मुख्यालय) मुंबई कार्यालयामध्ये निम्नलिखित विवक्षित कामकाजासाठी राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागातून / राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातून गट -ब (अराजपत्रित) [एस-१४ (वेतनश्रेणी रु.३८६००-१२२८००)] संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावयाची आहे.

यासंदर्भातील विवक्षित कामाचे / सेवेचे स्वरुप साधारणतः खालील प्रमाणे असेल :

(१) राज्य माहिती आयोगातर्फे दरवर्षी प्रसिद्ध करावयाच्या अहवालाच्या अनुषंगाने मंत्रालयीन विभाग व क्षेत्रीय कार्यालये यांचेकडून माहिती प्राप्त करणे,

(२) अप्राप्त माहिती प्राप्त करून घेण्यासाठी पाठपुरावा करणे,

(३) संबंधित कार्यालयांच्या बैठका आयोजित करणे,

(४)अहवालाचा कच्चा मसुदा तयार करणे,

(५) अहवालास मा.राज्य मुख्य माहिती आयुक्तांची मान्यता घेतल्यानंतर अहवाल छापण्यासाठी देणे,

(६) मसुद्याचे मुद्रित शोधन करणे,

२. उपरोक्त विवक्षित कामासाठी राज्य शासनाच्या प्रशासकीय विभाग / राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातील कामकाजाचा गट - ब च्या पदावरील किमान ३ वर्षांचा अनुभव असलेल्या एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याची सेवा करार पद्धतीने १ वर्षाकरिता घेण्याकरिता सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२७१५/प्र. क्र. २००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त गट- ब किंवा त्यापेक्षा वरिष्ठ संवर्गातील अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

३. वरील कामाकरिता इच्छुक सेवानिवृत्त गट- ब संवर्गातील अधिकाऱ्यांची सेवा करार पद्धतीने प्रथमतः १ वर्षाकरिता घेण्यात येईल व आवश्यकतेप्रमाणे सदर कालावधी करारान्वये वाढविण्यात येईल. मात्र असा एकूण कालावधी ३ वर्षापेक्षा जास्त असणार नाही. उक्त शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक - २०१६१२१७१७१८२४१३०७ असा आहे.



Scanned with CamScanner

४.	तरी इच्छुक उमेदवाराने त्यांचा अर्जासहित बायोडाटा, सचिव, राज्य माहिती आयोग (मुख्यालय), मुंबई, नवीन प्रशासकीय इमारत, १३ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ यांना दिनांक १५/०३/२०२४ पर्यंत पोहोचतील अशा बेताने समक्ष अथवा टपालाद्वारे अथवा [msic.do2@maharashtra.gov.in] या ईमेलवर सादर करावा. विहित दिनांकानंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जाचा विहित नमुना www.maharashtra.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर सविस्तरपणे उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

(सविता जावळे)
सचिव राज्य माहिती आयोग (मुख्यालय) मुंबई

Scanned with CamScanner

| गट- ब संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी विवक्षित कामासाठी करार पध्दतीने नियुक्तीसाठी करावयाचा अर्ज | पासपोर्ट साईज फोटो |
|---|---|
| उमेदवाराचे संपूर्ण नाव | |
| पत्र व्यवहाराचा पत्ता व ई-मेल:- | |
| दूरध्वनी क्रमांक /भ्रमणध्वनी क्रमांक | |
| जन्म दिनांक व दिनांक १ जुलै २०२३ रोजी असलेले वय :- | |
| सेवानिवृत्तीचा दिनांक व सेवानिवृत्तीच्या वेळेस धारण केलेले पद | |
| प्रवर्ग | |
| सेवानिवृत्ती वेतन घेत असलेल्या बँकेचे नाव,<br>खाते क्रमांक :- | |
| शैक्षणिक अर्हता- अर्हता, बोर्ड / विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण वर्ष, टक्केवारी, श्रेणी याबाबतच्या तपशीलासह | |
| संगणक व इतर अर्हता : | |
| शासकीय / राज्य माहिति आयोगातील कामकाजाचा अनुभव (याबाबत पदनाम ,कालावधी, केलेल्या कामाचा स्पष्ट तपशील नमूद करावा) | |

Scanned with CamScanner

| |
|---|
| प्रमाणित करण्यात येते की उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहिती पैकी कोणतीही माहिती असत्य चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कार्यवाही होऊ शकते याची मला पूर्ण जाणीव आहे. |
| कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरूपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणा अधिकार हक्क निर्माण होत नाही. मी नमूद केलेल्या तपशिलाच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास मी सादर करण्याची हमी देत आहे |

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

दिनांक

स्थळ

* वरील प्रमाणे नमूद सर्व कागदपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रति जोडणे आवश्यक

Scanned with CamScanner